**L. A. BILL No. XXI OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

## सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३ ऑगस्ट २०२२ चा महा. अध्या. ६. २०२२ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.
(२) तो, दिनांक ३ ऑगस्ट २०२२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये,— २०१७ चा महा. ६.

(एक) पोट-कलम (३) मधील, खंड (छ) मधील, दुस-या परंतुकामधील, तक्त्यातील खंड (घ), (च) व (छ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :–

| | | |
|---|---|---|
| "(घ) | विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगत नंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | १७ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (च) | ज्या वर्षामध्ये अनुपालन अहवाल प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या १ मे रोजी किंवा त्यापूर्वी. | २४ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (छ) | ज्या वर्षी असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी. | १ सप्टेंबर २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(दोन) पोट-कलम (४) मधील, दुस-या परंतुकामधील, तक्त्यातील खंड (घ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल:—

| | | |
|---|---|---|
| "(घ) | ज्या वर्षी राज्य शासनाने परवानगी दिली असेल त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी. | १७ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी.". |

२०२२ चा महा. अध्या. ६.

सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३**. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२२, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह), ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ९२८-२ (२५५—८-२०२२)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ संभाजी शिंदे,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई